महापालिका आयुक्त यांचे
कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्र.मआ/६/१२७०
दिनांक:- १२/०६/२०२६

## -: कार्यालयीन आदेश :-

विषय : नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसह महापालिका हद्दीतील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी उप आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करणेबाबत.

संदर्भ : १) अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय यांचे जा. क्र. अतिमआ(इ) / साप्रवि / आस्था / १८२३ दि. १९/०५/२०२६
२) महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ८२ दि.१२/०६/२०२६

वरील संदर्भाकीत १ चे कार्यालयीन आदेशानुसार पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील उप आयुक्त यांच्या कामकाज व्यवस्थेबाबत आदेश प्रसृत करण्यात आले होते. सदर आदेशामध्ये प्रशासकीय कारणास्तव अंशतः बदल करण्यास मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भांकीत ठरावानुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार श्री. सोमनाथ बनकर यांचेकडे अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचा संपूर्ण पदभार सोपवण्यात येत आहे.

शहर अभियंता यांचे नियंत्रणाखालील बांधकाम विकास विभागाचे झोन क्र. १ ते ६ या कार्यक्षेत्रात कार्यरत असणारे सर्व कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा व कनिष्ठ अभियंता या पद निर्देशित अधिकाऱ्यांनी स्वतःचे कामकाज सांभाळून श्री. सोमनाथ बनकर यांचे नियंत्रणाखाली आपापल्या कार्यक्षेत्रातील बेकायदेशीर व अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाईच्या नोटीसा बजावून अशा अतिक्रमित / बेकायदेशीर बांधकामे निष्कासित करणेची कारवाई करावयाची आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी वरील प्रमाणे पदभार स्वीकारलेबाबतचे निवेदन आमच्याकडे सादर करावयाचे आहे.

तरी संबंधित खाते प्रमुख यांनी जरूर ती तजवीज करावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :-
मा. खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका

यांसकडे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव...